**पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड**
**पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड,**
**प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे**
**ई मेल - dcphq.pcpc-mh@gov.in**

**प्रेसनोट दिनांक १०/१०/२०२४**

## घरफोडी करुन चोरी केलेले विदेशी बनावटीचे पिस्टल व ८० जिवंत काडतुसे असा एकुण १,८०,०००/- रु चा मुद्देमाल, मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाकडुन जप्त.

मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी आगामी विधानसभा, निवडणुकीचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पोलीस स्टेशन, गुन्हे शाखेकडील पथक व युनिट यांना पिंपरी चिंचवड शहरामध्ये अवैध्यरित्या शस्त्रे बाळगणाऱ्या गुन्हेगाराचा शोध घेवुन त्यांचेविरुध्द कडक कारवाई करणेबाबतचे आदेश दिले होते त्याअनुशंगाने पोलीस उप आयुक्त श्री संदीप डोईफोडे व सहा पोलीस आयुक्त गुन्हे १, श्री डॉ. विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाचे व.पो.नि. श्री विजय ढमाळ, अधिकारी व अंमलदार हे अवैध शस्त्र बाळगणारे गुन्हेगार यांची माहिती घेत होते.

दिनांक ०९/१०/२०२४ रोजी पोलीस उप निरीक्षक गोसावी, पोहवा १४५८ बनकर, पोहवा १२३६ मोरे पोशि २६४३ सावंत, पोशि ३०३४ कदम व पोशि २६७३ देवकर मालमत्ता गुन्हे विरोधी पथक असे पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना **पोशि २६७३ सुमित देवकर, पोशि २६४३ गणेश सावंत व पोशि ३०३४ हर्षद कदम** यांना त्याचे बातमी दारामार्फत बातमी मिळाली की दापोडी येथील पवना नदीचे कडेला एक इसम शस्त्र विक्री करीता येणार आहे अशी बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी जावुन त्यास ताब्यात घेवुन त्यास नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव चेतन राजु वानखेडे वय १९ वर्षे, रा. खडकी बाझार, पुणे. असे असल्याचे सांगितले त्याची अंगझडती घेतली असता त्यांचेकडे ०१ पिस्टल, ८० जिवंत काडतुसे मिळुन आल्याने ते जप्त करण्यात आली असुन त्याचे कडे सदर बाबत अधिक चौकशी केली असता त्यांचा विधी संघर्षीत बालक मित्र याने खडकी येथील आर्मी ५१२ बेस वर्क शॉप मधील वसाहती मध्ये घराफोडी करुन सदरचे विदेशी बनावटीचे पिस्टल व काडतुसे चोरी केले असल्याचे सांगितले त्याबाबत खडकी पोलीस ठाणे येथील अभिलेख तपासला असता खडकी पोलीस ठाणे गु.रजि.नं २९३/२०२३ भा.द.वि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**सदर आरोपी चेतन राजु वानखेडे वय १९ वर्षे, रा. खडकी बाझार, पुणे. याचे कडुन ०१ विदेशी बनावटीचे पिस्टल व ८० जिवंत काडतुसे किमंत अंदाजे १,८०,०००/- रु असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन याचे विरुध्द भोसरी पोलीस ठाणे येथे आर्म ॲक्ट कलम ३, ५ (२५), महा. पोलीस अधि. कलम ३७(१)(३)सह १३५. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे सो, पिंपरी चिंचवड, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. शशिकांत महावरकर, मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. वसंत परदेशी, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), संदीप डोईफोडे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १, डॉ. विशाल हिरे, यांचे मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, पोलीस उप निरीक्षक भरत गोसावी, तसेच पोलीस अंमलदार आशिष बनकर, गणेश सावंत, सुमित देवकर, हर्षद कदम, सोमनाथ मोरे, यांचे पथकाने केली आहे.

(संदीप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड